**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २००६/(३८६/०६)/ समन्वय
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १३ ऑक्टोबर, २००६

संदर्भ : (१) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक इएसटी १६०५/ (४३१/०५)/ आस्था-१, दिनांक ३ डिसेंबर, २००५
(२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : ई सेवा २००६/(१९१/०६)/ मशि-१, दिनांक १६ जून, २००६

**प्रस्तावना :**

राज्य शासनास विविध प्रयोजनासाठी सांख्यिकी माहिती गोळा करणे वेळोवेळी आवश्यक आहे. त्यानुसार प्रशासकीय विभागांकडून सांख्यिकी माहिती गोळा करण्यात येत असते. उच्च व तंत्र शिक्षण विभागात अशा प्रकारची सांख्यिकी माहिती गोळा करण्याची स्वतंत्र व्यवस्था अस्तित्वात नव्हती. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अंतर्गत येणा-या सर्व क्षेत्रिय कार्यालयातील, विद्यापीठातील व अनुदानित व विना अनुदानित महाविद्यालयांची सांख्यिकी माहिती प्राप्त करण्याकरीता खालीलप्रमाणे व्यवस्था करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

उच्च व तंत्र शिक्षण विभागाअंतर्गत एक **सांख्यिकी कक्ष** स्थापन करण्यात येत असून या सांख्यिकी कक्षाद्वारे सर्व विभाग प्रमुख, सर्व अकृषि विद्यापीठे इत्यादिकडून नियमितपणे सांख्यिकी माहिती गोळा करणे, त्यावर प्रक्रिया करणे व त्यांचे अहवाल तयार करुन केंद्र शासनास पाठविणे इत्यादि कामे सोपविण्यात येत आहेत.

२. संचालक, उच्च शिक्षण व संचालक, तंत्र शिक्षण , संचालक, व्यवसाय शिक्षण, संचालक, प्रशिक्षण, कला संचालक व ग्रंथालय संचालक यांचे कार्यालयातील उपसंचालक दर्जाच्या अधिका-यांची, या प्रयोजनासाठी "**संपर्क अधिकारी** " म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. संचालकांनी त्यांच्या संपर्क अधिका-याचे नाव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक शासनास वेळोवेळी कळवावे. क्षेत्रिय स्तरावर या कामाचे **सनियंत्रण करण्यासाठी सहसंचालक, उच्च शिक्षण** या कार्यालयातील प्रशासन अधिका-याची "**संपर्क अधिकारी** " म्हणून नियुक्ती करण्यात येत असून, त्या त्या विभागातील सर्व मान्यताप्राप्त अनुदानित व विना अनुदानित महाविद्यालयाची तसेच शासकीय महाविद्यालयाची सांख्यिकी माहिती प्राप्त करण्याची जबाबदारी या संपर्क अधिका-याची राहिल.

३. जिल्हा स्तरावरील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचे कार्यालयाच्या क्षेत्रात असणा-या संस्थेतील सहाय्यक/ सांख्यिकी सहाय्यक यांनी सांख्यिकी माहिती तपासण्याची कामे करावयाची आहेत.

४. **महाराष्ट्र ज्ञान महामंडळाची भूमिका**

महाराष्ट्र ज्ञान महामंडळासोबत सर्व विद्यापीठांनी शासन निर्णय, क्रमांक ई सेवा २००६/(१९१/०६)/ मशि-१, दिनांक १६ जून, २००६ अन्वये सामंजस्य करार करण्याचे आदेश शासनाने दिलेले असून त्या निमित्ताने ही माहिती सर्वात सुलभ पध्दतीने महाराष्ट्र ज्ञान महामंडळामार्फत उपलब्ध होऊ शकते आणि त्यास आवश्यक असणारी प्रक्रिया व निष्कर्ष इत्यादिबाबत योग्य ते सॉफ्टवेअर महाराष्ट्र ज्ञान महामंडळास तयार करता येईल. या अनुषंगाने तयार करण्यात आलेली विविध विवरणपत्रे संगणकावर घेऊन त्यामध्ये माहिती भरुन घेणे, त्याचे एकत्रिकरण करणे आणि प्रत्येक विभागाची माहिती संकलित करुन संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचेकडे ही कामे महाराष्ट्र ज्ञान महामंडळाने करावयाची आहेत. उच्च व तंत्र शिक्षण विभागातील उपसंचालक (सांख्यिकी) हे या कामाकरीता शासन स्तरावर **"संपर्क अधिकारी"** व **"समन्वय अधिकारी"** म्हणून कार्यरत रहातील. उपसंचालक (सांख्यिकी ) हे वेळोवेळी विभाग प्रमुखाच्या कार्यालयाला भेटी देऊन कामकाजाचा आढावा घेतील. तसेच विभाग

प्रमुखांनी देखील त्यांचे स्तरावर दरमहिन्यास त्यांचे कामाचा आढावा घ्यावा व तसा अहवाल प्रधान सचिवांना सादर करावा.

५. राज्यातील अकृषि विद्यापीठातील उपकुलसचिव हे सांख्यिकी माहिती पुरविण्यासाठी संपर्क अधिकारी म्हणून काम पहातील. विद्यापीठांनी अशा संपर्क अधिका-यांचे नामनिर्देशन करुन तसे महामंडळास व संचालक, उच्च शिक्षण यांना कळवावे. विद्यापीठांतर्गत येणारी व त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व महाविद्यालयांची व संस्थांची (शारिरीक प्रशिक्षण महाविद्यालय, समाजशास्त्र महाविद्यालय इत्यादिसह) माहिती प्राप्त करुन पुरविण्याची जबाबदारी सहाय्यक कुलसचिवांची राहिल. अशी माहिती महामंडळाने घालून दिलेल्या कालमर्यादेत विद्यापीठांनी महामंडळास द्यावी. विद्यापीठाकडे प्राप्त झालेली माहिती सहाय्यक कुलसचिवांनी महाराष्ट्र ज्ञान महामंडळाकडे संगणक जाळ्याद्वारे पाठवून त्याची एक प्रत संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचेकडे पाठवावी.

६. महाराष्ट्र ज्ञान महामंडळाने त्यांचेकडे प्राप्त झालेल्या सर्व विभागीय सहसंचालकांकडील व विद्यापीठाकडील माहितीवर योग्य ती प्रक्रिया करुन त्यांचे निष्कर्ष तयार करावे व तसा अहवाल संचालक, उच्च शिक्षण यांचेकडे मसुदा स्वरुपात पुस्तिका सादर करावी. संचालक, उच्च शिक्षण हे त्याची योग्य ती छाननी व विश्लेषण करुन ही सांख्यिकी माहिती शासनाच्या मान्यतेनंतर पुस्तिकारुपाने प्रसिध्द करतील.

७. या शासन निर्णयातील सूचनेचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

८. हा शासन निर्णय, राज्य शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २००६१०१३१५०५०५००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(जॉयस शंकरन)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
(१) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
(२) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
(३) संचालक, व्यवसाय शिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
(४) संचालक, प्रशिक्षण, शिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
(५) कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
(६) ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
(७) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
(८) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
(९) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
(१०) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
(११) सर्व विद्यापीठांचे कुलसचिव,
(१२) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
(१३) सर्व विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
(१४) सर्व विभागीय उपसंचालक, व्यवसाय व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य.
(१५) सर्व जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
(१६) उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व कार्यासने,
(१७) निवड नस्ती कार्यासन आस्था १.